**ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी स्त्रोत निश्चिती करण्याची जबाबदारी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेबरोबर इतर सक्षम संस्थांना देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय ग्रापापु १००३/प्र.क्र.१२३/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : ३० जून, २००३**

***प्रस्तावना :***

राज्यात मागणी आधारित व लोकसहभागातून पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या योजना राबविण्याचे धोरण जाहीर झाल्यानंतर व या धोरणांतर्गत ग्रामस्तरावरून त्या योजनांची सुयोग्य अंमलबजावणी होण्यासाठी सर्वोपरी सहकार्य करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदांवर सोपविण्यात आल्यानंतर भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील काही भूवैज्ञानिकांच्या सेवा ग्रामस्थांना उचित तांत्रिक सहकार्य व मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा परिषदांकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. यापुढे योजनेचे नियोजन, अंमलबजावणी व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती गाव स्तरावरच होणार असल्याने, ग्रामस्थांच्या मागणीनुसार योजना निश्चित करावयाची आहे. योजनेची निश्चिती करताना योजनेसाठी आवश्यक स्त्रोताचे प्रमाणीकरण जिल्हापरिषदेकडील भूवैज्ञानिकांनी करावे अशी अपेक्षा होती. हे प्रमाणीकरण करताना भूवैज्ञानिकांनी ते स्वतंत्रपणे न करता गावातील लाभधारक ग्रामस्थांशी चर्चा करुन, त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या स्थानिक पारंपारिक ज्ञानाचा उपयोग करून करावे अशी अपेक्षा आहे.

२. परंतु, हे सर्व करण्यासाठी जिल्हापरिषदेकडील भूवैज्ञानिकांच्या सेवा काही वेळेला कमी पडतात असे निदर्शनास आले आहे. एवढेच नव्हे तर, प्रत्येक जिल्ह्यातील वरिष्ठ भूवैज्ञानिकाकडे असलेल्या भूवैज्ञानिकांच्या सेवाही तातडीने उपलब्ध होत नाहीत कारण, यापैकी जिल्हा परिषद व राज्य क्षेत्रातील सर्वच भूवैज्ञानिक सातत्याने टंचाईच्या कामात गुंतलेले असतात. अशाही परिस्थितीत काही जिल्ह्यात भूवैज्ञानिकांनी टंचाईच्या कामातून वेळ काढून गावांना त्यांच्या मागणीनुसार आवश्यक तांत्रिक तपासणी करून स्त्रोत प्रमाणीकरण करुन दिले आहे. परंतू, कार्यबाहुल्यामुळे ते गावकऱ्यांशी चर्चा व त्यांच्यासोबत गावात प्रत्यक्ष फिरुन पी. आर. ए. (PRA) पध्दत अवलंबून न देता स्वतंत्रपणे दिले आहे.

३. यामुळे जागतिक बँकेने निश्चित केलेल्या ३ पथदर्शी जिल्ह्यात व जर्मन प्रकल्पात अंतर्भूत ३ जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यासाठी स्त्रोत प्रमाणीकरणास वेळ लागून गावकऱ्यांना योजना सुरु करण्यास ३ ते ४ महिन्याचा विलंब झालेला आहे असे दिसून आले आहे.

४. या परिस्थितीचा विचार करुन जागतिक बँकेने अशी सूचना केली आहे की, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडील भूवैज्ञानिकांच्या सेवेशिवाय निमशासकीय अथवा खाजगी क्षेत्रात जर असे सर्वेक्षण तांत्रिकदृष्टया लोकसहभागातून करू शकणाऱ्या सक्षम निमशासकीस अथवा खाजगी यंत्रणा व भूवैज्ञानिक उपलब्ध असतील तर त्यांच्यामार्फत पिण्याच्या पाण्यासाठी स्त्रोत प्रमाणीकरण करुन घेण्याची मुभा गावाला / ग्रामपंचायतींना असावी.

५. जागतिक बँकेने केलेली सूचना विचारात घेऊन, ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत प्रमाणीकरण करण्याचे काम भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणे बरोबर इतर सक्षम निमशासकीस अथवा खाजगी यंत्रणांकडून करून घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

***<u>शासन निर्णय</u>*** :

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन शासन, जागतिक बँक पुरस्कृत **"जलस्वराज्य"** प्रकल्पांतर्गत तसेच जर्मन शासन पुरस्कृत केएफडब्ल्यू च्या सहाय्याने सुरू असलेल्या **"आपलं पाणी"** या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेबरोबर विहित मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करून शासनाने अथवा शासनाच्या वतीने प्राधिकृत केलेल्या यंत्रणेने तयार केलेल्या पॅनेल वरील इतर सक्षम निमशासकीय अथवा खाजगी यंत्रणांकडून प्रमाणीकरण करुन घेण्याची मुभा गावाला / ग्रामपंचायतींना देत आहे.

२. तसेच, एखाद्या विशिष्ट कालावधीत येणाऱ्या कामाच्या अतिव्यापामुळे, विशेषतः टंचाईच्या कालावधीत जिल्हा परिषदेकडील, तसेच वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयाकडील भूवैज्ञानिकांच्या सेवा कमी पडत असल्यास, संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या मान्यतेने अशा पॅनेलवरील सक्षम निमशासकीय अथवा खाजगी यंत्रणांकडून पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत प्रमाणीकरण करुन घेण्यास मुभा देण्यात येत आहे.

३. निमशासकीय अथवा खाजगी यंत्रणांनी गावांना चुकीचे प्रमाणपत्र देऊ नये अथवा यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या दरांपेक्षा जादा रकमेची आकारणी करु नये म्हणून अशा निमशासकीय अथवा खाजगी यंत्रणांची तांत्रिक व आर्थिक क्षमता विचारात घेऊन त्यांचे पॅनेल करण्यासाठीचे आवश्यक निकष व दर शासन स्तरावरुन ठरवून देण्यात येतील. या पॅनेलवरील यंत्रणा व त्यांचे भूवैज्ञानिकांकडूनच शासन ठरविल त्या दराने स्त्रोत

प्रमाणीकरण करुन घेण्यात यावे. पॅनेलवरील यंत्रणेच्या कामाची तांत्रिक तपासणी वेळोवेळी संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांच्याकडून करण्यात येईल.

४. यासाठी येणारा खर्च हा संबंधित मंजूर योजनेच्या प्राकलने व आराखडयाचा भाग राहील व तो संबंधित योजनेसाठी/ प्रकल्पासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

( सुधीर ठाकरे)
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पूणे
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जिल्हा परिषद (सर्व)
उपअभियंता (यांत्रिक) यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

---------



एच-365(3,000-6-03)-2.